# बाबा मुक्तानंदांच्या समयातीत शिकवणी

## परिचय

*श्रीगुरूंचे शब्द हे मंत्र असतात.* हे एक ‘शिवसूत्र’ आहे, जे सिद्धयोग मार्गावर नेहमी शिकवले गेले आहे आणि श्रीगुरूंच्या शिकवणींच्या अध्ययनाचा आरंभ करण्यापूर्वी हे सूत्र समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. इतकेच नव्हे, तर वर्ष २०२६मध्ये सिद्धयोगी व नवीन साधक आतापर्यंत जे अध्ययन करत आले आहेत, विशेषतः ‘श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान’ आणि ‘स्वामी मुक्तानंदांच्या वचनांवर ध्यान’ यांच्या माध्यमातून केलेले त्यांचे अध्ययन याच सिद्धान्तावर आधारित आहे.

मे महिन्यादरम्यान—जो बाबा मुक्तानंदांच्या जन्मदिवसाचा महिना आहे—तुमच्यापाशी आणखी एक संधी आहे, ज्यायोगे तुम्ही बाबांच्या शिकवणींवर चिंतनमनन करू शकाल तसेच त्यांच्या शब्दांमध्ये निहित असलेल्या शक्तीपर्यंत पोहोचू शकाल, तिचे अन्वेषण करू शकाल आणि ती अनुभवू शकाल. प्रत्येक आठवड्याला, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर बाबांची एक शिकवण पोस्ट केली जाईल, आणि त्याचबरोबर त्या शिकवणीवर एक भाष्यदेखील असेल. ही भाष्ये सिद्धयोग मार्गाच्या अनुभवी विद्वानांनी व लेखकांनी लिहिली आहेत. या भाष्यांमध्ये त्यांनी संस्कृत भाषा, भारताचे शास्त्रग्रंथ आणि सिद्धयोगाच्या शिकवणींविषयीच्या त्यांच्या ज्ञानाच्या आधारे त्या शिकवणीचा एक पैलू किंवा तिचे अनेक पैलू समजावून सांगितले आहेत.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.